# तेंदू बाबत संक्षिप्त टिप्पणी

१. तेंदू व्यापारातील पुर्व इतिहास :- तेंदूपानांचा व्यापार हा परंपरागत असून तेंदूपानांचे ठेके हे वार्षिक किंवा बहूवार्षिक पद्धतीने ठेकेदाराला विकल्या जात होते. सदर ठेके हे फक्त वन जमिनीपुर्ते मर्यादित होते. यामध्ये शासनाची पडीत जमिन किंवा खाजगी जमिनीवरील तेंदूपत्त्याचा समावेश नव्हता. तेंदूपत्ता जमा करणा-या मजूरांना मजूरी ही तेंदूपत्ता खरेदी करणा-या व्यापाराकडून त्यांनी ठरविलेल्या दरानुसार देण्यांत येत होती. मजूरीचे दर हे शासनातर्फे ठरविल्या जात नव्हते. या पद्धतीमध्ये वन विभागातील तेंदूपत्त्याची तस्करी होण्याची तसेच मजूरांना त्यांनी केलेला कामाची कमी मजूरी मिळण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. त्यामुळे महाराष्ट्र राज्यात तेंदूपानांचा व्यापार नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र गौण वनोत्पादन (व्यापाराचे नियमन) अधिनियम १९६९ हा अधिनियमित करण्यांत आला. त्यानुसार तेंदू व आपटापानाच्या व्यापारावर शासनाचे एकाधिकार आहे. त्यानुसार सुरुवातीस वनखात्यामार्फत तेंदूपाने संकलन व विक्री करण्यात आले. नंतर सन १९९० पासून एकमुस्त पध्दतीने तेंदू घटक कंत्राटदारांना विक्री करण्यात येत आहे.

२. सन १९९३ पासून सुधारित एकमुस्त पध्दतीनुसार (modified lumpsum system) तेंदू घटकाच्या विक्रीकरिता वृत्तपत्रात जाहिराती देऊन निविदा मागविण्यात येते. सदर लिलावात एक रक्कमी जास्तीची बोली देणा-या ठेकेदारास परवानाधारक (Licensee) म्हणून नियुक्ती केल्या जाते आणि निविदेतील अटी व शर्ती प्रमाणे करारनामा झाल्यानंतर परवानाधारक सदर घटकातील तेंदूपाने संकलन करून घेऊन जातो. तेंदु पाने संकलन करणा-या मजुरांना शासनाने विहित केलेल्या दरानुसार परवानाधारकाकडून मजुरी वाटप करण्यात येते.

३. सन १९९६ मध्ये केंद्र शासनाने पारित केलेल्या पेसा अधिनियमाच्या अनुषंगाने महाराष्ट्रामध्ये महाराष्ट्र अनुसूचित क्षेत्रातील गौण वनोत्पादनाच्या मालकीचे हस्तांतरण व महाराष्ट्र गौण वनोत्पादन (व्यापाराचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम १९९७ काढण्यात आला आहे. त्यानुसार ३३ गौण वनोपजाचे मालकी हक्क गांमपंचायतींना देण्यांत आले. परंतु त्यामध्ये तेंदू व आपटा पाने यांचा समावेश नव्हता.

**तेंदू पाने व्यापारात करण्यांत आलेल्या सुधारणा:-**

**(अ)** वर्ष २००६ च्या तेंदू हंगामापासून तेंदू पानांच्या विक्री पासून प्राप्त होणारा निव्वळ नफा प्रोत्साहनात्मक मजुरीच्या स्वरूपात तेंदूपाने संकलन केलेल्या मजूरांना वाटप करण्याचा निर्णय शासनांने शासन निर्णय क्रमांक एमएफपी-२१०४/प्र.क्र.६७/फ-१, दिनांक २८/२/२००६ व अन्वये घेतला त्यानुसार

स्वामित्व शुल्कातून प्रशासकीय खर्च वजा करून शिल्लक रक्कम प्रोत्साहनात्मक मजूरी म्हणून वाटप करण्यात येत आहे.

**(ब)** सन २०१३ तेंदू हंगामापासून तेंदू घटक/घटक समूहांची विक्री ई-निविदा पध्दतीने करण्यांत येत आहे.

**(क)** अनुसूचित जमाती व इतर पारपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत सामूहिक वनहक्क मंजूर असलेल्या गावांमध्ये सन २०१३ व सन २०१४ मध्ये अनुक्रमे १९ व ३३ गावांमध्ये तेदू पाने संकलनाचे काम सामूहिक वनहक्क धारकांना करण्यांस परवानगी देण्यात आलेली आहे.

सन २०१४ तेंदू हंगामात तेंदूपाने लिलावाची विक्रीसाठी राज्यातील एकूण ४५६ तेंदू घटक/घटक समूह विक्रीसाठी ठेवण्यात आले. त्याअनुषंगाने विक्रीस ठेवलेल्या एकूण ४५६ घटक/घटक समुहांपैकी आतापर्यंत २८८ घटक/घटक समुह (४५४५२० प्रमाण गोणी) विक्री झालेले असून त्यापासून रू. ५४,९३,०९,७५०/- इतकी विक्री किंमत प्राप्त झालेली आहे.

४. तेंदूपाने उत्पादनापासून मिळणारे उत्पन्न व मजूरांना मिळालेल्या मजूरीची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | तेंदू हंगाम | विक्रीसाठी ठेवलेले | | विक्री झालेले | | प्रत्यक्ष उत्पादन (प्रमाण गोणी ) | विक्री किंमत (कोटीत) | मजूरांना मिळालेली संकलन मजुरी (रु.कोटीत) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | घटक | प्रमाण गोणी | घटक | प्रमाण गोणी | | | |
| १ | २ | | | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | २००६ | ४३७ | ७७०९०० | २३९ | ६२२९०० | ५१९७५१ | २१.८० | ४०.२६ |
| २ | २००७ | ४३७ | ७७०९०० | ४३७ | ७७०९०० | ७६६६६८ | ९५.५२ | ५९.२२ |
| ३ | २००८ | ४३७ | ७७०९०० | ४०७ | ७३८२०० | ७०५९५० | ४४.६५ | ५१.२१ |
| ४ | २००९ | ४३७ | ७७०३०० | ४०५ | ७३५९०० | ६४७७२४ | ६३.४४ | ५२.०९ |
| ५ | २०१० | ४३७ | ७६५७०० | ४१९ | ७५१८०० | ६४२१८९ | ९०.५६ | ५८.२८ |
| ६ | २०११ | ४६३ | ७६४२०० | ३९९ | ६७६९०० | ६२१४२६ | १००.०८ | ८४.५८ |
| ७ | २०१२ | ४६१ | ७१०६९० | ४३४ | ६८८५९० | ६६७२२४ | १४०.६० | १०५.५५ |
| ८ | २०१३ | ४५७ | ६९६१५० | ३०९ | ४८०७४० | ४४८४१० | ६३.६२ | ८१.९७ |
| ९ | २०१४ | ४५६ | ६९४९४५ | २८८ | ४५४५२० | ४४८४४४ | ५४.९३ | ८९.९७ |

५. सन २००६ पासून वाटप करण्यात आलेल्या प्रोत्साहनात्मक मजुरीचा तपशील खालील तक्त्यात देण्यांत येत आहे:-

### तेंदूपाने संग्रहणकर्त्यांना प्रोत्साहनार्थ मजूरी वाटपाचे संक्षिप्त विवरण

| वर्ष | स्वामित्व शुल्क (रू. कोटीत) | प्रशासकिय खर्च (रू. कोटीत) | कुटुंब संख्या (हजारात) | प्रोत्साहनात्मक मजूरी (रू. कोटीत) | वाटपाची स्थिती | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | कुटुंब प्रमुख्याची संख्या (हजारात) | प्रोत्साहनात्मक मजूरीचे वाटप (रू. कोटीत) | |
| २००६ | २१.७५ | ८.३४ | ३८२.३ | १३.४१ | ३७९ (९९.३%) | १३.३६ (९९.६%) | वाटपाची कार्यवाही पुर्ण मजूरांचा शोध न लागल्याने उर्वरित रक्कम शासन महसूल म्हणून जमा करण्यात आली आहे. |
| २००७ | ९४.८९ | ८.२७ | ४८०.० | ८६.६२ | ४७५ (९९.१%) | ८६.०९ (९९.३%) | |
| २००८ | ४४.५२ | ८.६५ | ४९९.७ | ३५.८७ | ४९६ (९९.२६%) | ३५.६० (९९.२५%) | |
| २००९ | ६३.५५ | १०.८० | ४५९.० | ५२.७५ | ४५४ (९८.८५%) | ५२.०० (९८.५८%) | |
| २०१० | ९०.५६ | १३.६१ | ४४५.० | ७६.९५ | ४०१ (९६.७१%) | ७४.२१ (९७.५३%) | वाटपाची कार्यवाही सुरू आहे. |
| २०११ | ९९.७३ | १५.१७ | ४१२.० | ८४.५६ | ३७६ (९७.५९%) | ८२.०० (९७.११%) | वाटपाची कार्यवाही सुरू आहे. |
| २०१२ | १४१.२५ | १५.४३ | ४४९.०० | १२३.९८ | ४२३ (९५.५३.%) | ११९.२९ (९५.९८%) | वाटपाची कार्यवाही सुरू आहे. |

## ६. सन २०१४ तेंदू हंगामात वनवृत्त निहाय सामूहिक वन हक्का अंतर्गत तेंदू पाने संकलनाचा तपशिल:-

| तेंदू हंगाम वर्ष | वनवृत्त | गावांची संख्या | सामुहीक वन हक्का अंतर्गत संकलन उद्दिष्ठ प्रमाण गोणी गावाचे नाव | संकलन साध्य प्रमाण गोणी |
|---|---|---|---|---|
| 2013 | गडचिरोली | 12 | 1466 | 1121.567 |
| | नागपूर | 5 | 1150 | 972.530 |
| | अमरावती | 2 | 200 | 73.999 |
| | **एकुण** | 19 | 2816 | 2168.096 |
| 2014 | गडचिरोली | 18 | 1635 | 1987.460 |
| | नागपूर | 15 | 2672 | 1845.330 |
| | **एकुण** | 33 | 4307 | 3832.790 |

७. **अधिनियमात करण्यांत आलेंल्या सुधारणा:-**

(अ) **महाराष्ट्र वनोत्पादन (व्यापाराचे विनियमन) अधिनियम १९६९ मध्ये महाराष्ट्र शासन राजपत्राद्वारे दिनांक १९ जून, २०१४ रोजी खालील प्रमाणे सुधारणा निर्गमित केलेल्या आहेत.**

(१) ग्राम वनव्यवस्थापन समिती म्हणजे संयुक्त वन व्यवस्थापन समिती किंवा अशी कोणतीही समिती जी महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियमाच्या कलम ४९ अन्वये स्थापीत केलेली असेल याचा नव्याने समावेश करण्यांत आलेला आहे.

(२) ग्राम व्यवस्थापान समितीला देण्यांत आलेले क्षेत्र तेंदू घटकातून वगळण्यांत आले आहे.

(३) वन ग्राम व्यवस्थापन समितीला गोळा केलेले वन उत्पादन वाहतूक व साठवणूक करण्यांचे अधिकार देण्यांत आलेले आहेत.

(४) शासनाच्या सल्लागार समितीमध्ये ग्रामव्यवस्थापन समितीच्या एका सदस्याचा समावेश करण्यांत आलेला आहे.

(५) ग्राम वन व्यवस्थापन समितीला देण्यांत आलेल्या क्षेत्रातून गोळा करण्यांत आलेल्या वनोत्पादनाची किंमत ठरविण्याचा अधिकार ग्राम वन व्यवस्थापन समितीला देण्यात आलेला आहे.

(६) ग्राम वन व्यवस्थापन समितीला देण्यांत आलेल्या क्षेत्रातून गोळा करण्यांत आलेले वनोत्पादन साठवणूक करण्यांचे आगार ठरविण्यांचा अधिकार देण्यांत आलेला आहे.

(७) ग्राम वन व्यवस्थापन समितीला देण्यांत आलेल्या क्षेत्रातील गोळा केलेले वनोत्पादन खरेदी करणे व त्या वनोत्पादनाची किंमत ठरविणे यांचे अधिकार ग्राम वन व्यवस्थापन समितीला देण्यांत आलेले आहे.

(८) वनोत्पादनाच्या उत्पादका प्रमाणे ग्राम वन व्यवस्थापन समितीला स्वत:ा नोंदणी करण्यांची आवश्यकता नाही.

(९) वनग्राम घोषित करण्यासाठी शासनाने ठरविलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून वनग्राम समिती मार्फत खरेदी किंवा गोळा केलेल्या वनोपजाची विक्री किंवा तत्सम विल्हेवाट पध्दती समितीस योग्य वाटेल त्याप्रमाणे निश्चित करेल.

(ब) **महाराष्ट्र अनुसूचित क्षेत्रातील गौण वनोत्पादनाच्या मालकीचे हस्तांतरण व महाराष्ट्र वनोत्पादन (व्यापाराचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम १९९७ मध्ये महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी दिनांक १९ ऑगस्ट २०१४ रोजी अधिसूचनेद्वारे पुढील प्रमाणे सुधारणा केलेल्या आहेत.**

१.० गौण वनोपजाच्या व्याखेचा विस्तार करुन त्यात तेंदू, बांबू, आणि इतर गौण वनोपजांचा समावेश केलेला आहे.

२.० उक्त अधिनियमातील ३३ गौण वनोपजाचे परिशिष्ट रद्द करण्यात आलेले आहे.गौण वनोपजाचे मालकी हक्क पंचायतीसह ग्रामसभानां सुध्दा देण्यात आलेले आहेत.

३.० गौण वनोपजाचे मालकी हक्क पंचायतीसह ग्रामसभाना सुध्दा देण्यात आलेले आहेत.

------------OXO----------